# जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, कोल्हापूर

## जिल्हास्तरीय “ताराराणी महोत्सव २०१७”

### महिला स्वयंसहायता बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तूंचे विक्री व प्रदर्शन

ग्रामविकास विभागामार्फत दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील व्यक्तींचे जीवनमान उंचावून,देशातील प्रगत तंत्रज्ञान सोप्या पध्दतीने त्यांच्यापर्यंत पोहोचवून त्यांना स्वयंरोजगार मिळवून देण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाने सन २०१२-१३ पासून महाराष्ट्र राज्य ग्रामीण जिवनोन्नती अभियान सुरु केलेले आहे. यामध्ये स्वयंसहायता गटांना व्यवसायाभिमुख प्रशिक्षण देण्यात येते तसेच त्यांना व्यवसायासाठी बँकांमार्फत कर्ज आणि नियमित परतफेड करणा-या स्वयंसहाय्यता समुहांना शासनामार्फत व्याज अनुदान उपलब्ध करुन देण्यात येते. त्याअनुषंगाने महिला स्वयंसहायता बचत गटांनी तयार केलेल्या वस्तूंना हक्काची बाजारपेठ मिळण्याच्या उद्देशाने शासनस्तरावर प्रत्येक विभाग व जिल्हा स्तरावर विक्री प्रदर्शने आयोजित करुन त्यांना आर्थिकदृष्टया सक्षम करणेत येत आहे.

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,जिल्हा परिषद कोल्हापूर मार्फत जिल्हास्तरावर "**ताराराणी महोत्सव २०१७** " हा खराडे कॉलेज कॅम्पस, रंकाळा येथे आयोजित करणेत आलेला असून दि.११/०३/२०१७ रोजी या महोत्सवाचे मा.ना.श्री.चंद्रकांतदादा पाटीलसो ,पालकमंत्री ,कोल्हापूर यांचे शुभहस्ते उदघाटन करणेत आले आहे.

या महोत्सवामध्ये विविध वस्तूचे व कलाकुसरीचे १२० स्टॉल व खाद्यपदार्थाचे शाकाहारी /मांसाहारी व इतर असे ३८ असे एकूण १५८ स्टॉल उभारणेत आले आहेत. या महोत्सवाला दिनांक १३/०३/२०१७ रोजी जिल्हा परिषद कर्मचारी कला मंच यांचा कार्यक्रम आयोजित करणेत आलेला होता,या कार्यक्रमाचे उदघाटन मा.आमदार डॉ.सुजित मिणचेकर यांचे हस्ते करणेत आले.यानंतर मा.आ.डॉ.मिणचेकर साहेबांनी सर्व बचत गटांच्या स्टॉलला भेट दिली व सर्व महिलांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले.जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत करणेत आलेल्या नियोजनाचे त्यांनी मन:पूर्वक अभिनंदन केले.सालाबाद प्रमाणे यावर्षीही कोल्हापूरकरांनी प्रंचड प्रतिसाद दिलेला आहे.पहिल्याच दिवशी रू.२,९०,९३६/- इतकी विक्री झाली असून दुस-या दिवशीही ग्राहकांनी खरेदीसाठी व स्वादिष्ट भोजनाचा आस्वाद घेणेसाठी मोठया प्रमाणात गर्दी केलेली होती,या दिवशीही रक्कम रूपये ६,०९,६००/- तर तिस-या दिवशी ८,०३,५३५/- इतकी व चौथ्या दिवशी झी मराठी हास्यसम्राट प्रा.अजितकुमार कोष्टी यांचा धम्माल विनोदी कार्यक्रम आयोजित करणेत आलेला होता या कार्यक्रमास कोल्हापूरकरांनी अलोट गर्दी केलेली होती.या हास्य करमणूकीचा आनंद घेवून रसिक प्रेक्षकांनी मोठया प्रमाणात खरेदी केली यामुळे ग्रामीण भागातील बचत गटांना सक्षम करण्याचे बळ ग्राहकांनी दिले आहे. या दिवशी रक्कम रूपये ८,५०,३००/- दि.१५-३-२०१७ इ.रोजी ५,१२,७९०/- इतकी विक्रमी खरेदी केलेली आहे.बचत गटांनी उत्पादीत केलेल्या मालाची दिनांक ११/०३/१७ ते १५/०३/२०१७ ची एकुण विक्री र.रू. ३०,६७,१६१ /- इतकी झालेली आहे.

दिनांक १५-३-२०१७ इ.रोजी ताराराणी महोत्सवाचा सांगता समारंभ मा.नामदार सदाभाऊ खोत,मंत्री,कृषि व पणन यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला . यावेळी मा.नामदारसाो यांनी ग्रामीण भागातील महिला बचत गटांना हक्काची

कायमस्वरुपी बाजारपेठ उपलब्ध करुन देणे बाबत सुचीत केले. तसेच या महोत्सवातील १० बचत गटांनी कॅशलेस व्यवहार सुरु केलेबद्दल कौतुक केले. संत सावता माळी भाजीपाला आठवडी बाजार केंद्रामध्ये या बचत गटांना सहभागी करुन घेण्याबद्दल जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना सूचित केले. जिल्हा तसेच तालुकास्तरावर या बचत गटांनी उत्पादीत केलेल्या मालाला कायम स्वरुपी बाजारपेठ उपलब्ध करुन देणेस सांगितले. या बचत गटांनी इथून पुढे कॅशलेस व्यवहार करावेत असे सुचविले. तसेच शेवटी कमी कालावधीत या महोत्सवाचे उत्कृष्ट आयोजन केले बद्दल जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा.डॉ.कुणाल खेमनार व डॉ. हरिश जगताप,प्रकल्प संचालक,जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांचे कौतुक केले.

यानंतर महोत्सवामध्ये उच्चांकी विक्री झालेले अनुक्रमे वस्तुंचे व खादयांचे गट यांना प्रमाणपत्र वितरीत करणेत आले. वस्तू मध्ये धनसंपदा महिला बचत गट कसबा नूल ता.गडहिंग्लज, गुरुदेव महिला बचत गट धामोड ता.राधानगरी, प्रियदर्शनी महिला बचत गट अक्कलकोट जि.सोलापूर यांना तर खादयांच्या गटामध्ये गुरुदत्त महिला बचत गट आसुर्ले ,खतीजा महिला बचत गट चिंचवाड ता.करवीर, आशा महिला बचत गट बहिरेवाडी ता.आजरा यांना प्रमाणपत्र वितरीत करणेत आले.

यानंतर मा.सौ.संयोगीताराजे छत्रपती यांच्या उपस्थितीत सहभागी महिला बचत गट यांना सहभागाचे प्रमाणपत्र वितरीत करणेत आले. या प्रसंगी सहभागी बचत गटातील महिलांनी आपले मनोगत व्यक्त केले. मा.सौ.संयोगीताराजे छत्रपती यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना या महिला बचत गटांना जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेने उत्पादीत वस्तू विक्रीसाठी ताराराणी महोत्सवाचे आयोजन करुन हक्काची बाजारपेठ उपलब्ध करुन दिली आहे याबद्दल जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी,डॉ.कुणाल खेमनार व प्रकल्प संचालक,जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा डॉ.हरिश जगताप यांचे विशेष अभिनंदन केले.

या प्रसंगी या कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी मा.सौ.सई खराडे ,माजी महापौर, कोल्हापूर महानगरपालिका यांनी कमी कालावधीत ताराराणी महोत्सवाचे नेटके आयोजन केले बद्दल जिल्हा प्रशासनाचे अभिनंदन केले. तसेच पुढील वर्षीही हा महोत्सव याच ठिकाणी घेणे बद्दल सूचित केले. तसेच मा.अध्यक्षा,जिल्हा परिषद,कोल्हापूर सौ.विमलताई पुंडलीक पाटील यांनी सहभागी महिला बचत गटांचे कौतुक केले.

सहा.प्रकल्प अधिकारी, श्री.सचिन पानारी यांनी आभार व्यक्त करतांना मा.नामदार श्री.चंद्रकांत दादा पाटील, मंत्री महसूल,सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मदत व पुनर्वसन, यांचे ,तसेच मा.नामदार सदाभाऊ खोत,मंत्री,कृषि व पणन, जिल्हा परिषद अध्यक्ष,मा.विमलताई पाटील, इतर सर्व जिल्हा परिषदेचे पदाधिकारी, कै.सखाराम बापू खराडे कॉलेज कॅम्पस महोत्सवासाठी उपलब्ध करुन दिल्याबद्दल सौ.सई खराडे,माजी महापौर यांचे ,मंगल डेकोरेटर्स यांनी कमी कालावधीत मंडप उभारणी केले बद्दल व्यवस्थापकांचे, महानगरपालिकेचे अग्निशामक विभाग, पाणी पुरवठा विभाग, वाहतूक नियंत्रण विभाग, जिल्हा परिषदेचे सर्व खातेप्रमुख, सर्व गट विकास अधिकारी, विस्तार अधिकारी, गट समन्वयक, सी.आर.पी.,बचत गटातील सर्व महिला तसेच या महोत्सवाला सहकार्य करणा-या सर्व ज्ञात - अज्ञातांचे आभार मानून महोत्सवाची सांगता झाल्याचे जाहीर केले.